(2)

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

गुरूवर्य मामासाहेब दांडेकर कला भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर जि. नाशिक अंतर्गत राज्यशास्त्र विभाग आयोजित

# २६ नोव्हेंबर संविधान दिन कार्यक्रम अहवाल २६/११/२०१८

राज्यशास्त्र विभागाच्या वतीने रविवार दि.२६ नोव्हेंबर हा संविधान दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. संविधान ग्रंथ आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन व अभिवादन केल्यानंतर प्राचार्य डॉ.डी.बी.शिंदे यांनी आपल्या भाषणात असे म्हटले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहीलेल्या संविधानामुळे देश आजही एकत्र बांधलेला आहे. माणसामाणसात भेद निर्माण करणाऱ्या व हुकूमशाही संस्कृतीला विरोध करत लोकशाही रूजविण्याचे कार्य त्यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची संसदेतील अभ्यासपूर्ण भाषणे आजही संदर्भ म्हणून वापरली जातात. त्यांना उत्कृष्ट संसदपटू म्हटले जात असत. त्यांचे भाषण म्हणजे बौध्दीक मेजवाणी आहे. तसेच याप्रसंगी प्रा.श्रीमती जयश्री बागुल यांनीही संविधान दिनानिमित्त आपले विचार मांडले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.आर.व्ही.पवार, प्रा.श्रीमती शकुंतला गायकवाड, कार्यालयीन प्रबंधक श्री. मते, प्रा.वसंत बडवर, डॉ.एस.एन.पगार, डॉ.संतोष दळवी, प्रा.योगेश भारस्कर, सुभाष अहिरे, प्रा.श्रीमती मोहिनी गुरव, प्रा.श्रीमती दिपाली सुर्यवंशी, प्रा.जगताप, प्रा.श्रीमती सोनवणे, आनंद कांडेकर, अशोक नवले, संजय बोराडे, श्री मवाळ, श्री.दत्तु वारूंगसे, श्री.दिपक वाजे इ.शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी राज्यघटनेचा सरनामा म्हणजेच उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले व संविधान दिन साजरा करण्यात आला.

- सोबत कार्यक्रमाचे फोटो

प्रा.ए.ए.पोटे
विभागप्रमुख
HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
G.M.D. Arts, B.W. Commerce
And Science College, Sinnar

डॉ. दिलीप बी.शिंदे
प्राचार्य
प्राचार्य
जी. एम. डी. आर्टस् बी. डब्ल्यु. कॉमर्स
अँण्ड सायन्स कॉलेज सिन्नर, जि. नाशिक

# सिन्नर महाविद्यालय व राज्यशास्त्र विभाग वतीने २६नोव्हें. 'भारतीय संविधान दिन' उत्साहात साजरा





प्राचार्य डॉ.दिलीप शिंदे, सहकारी प्राध्यापक व
सेवक उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन व शपथ घेतांना





२६/११मुबंईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीदवीरांना
व निष्पाप बळी गेलेल्या नागरिकांना भावपूर्णअभिवादन!